
महाराष्ट्र टाइम्स

# विद्यार्थ्यांची संशोधन क्षमता रूंदावण्यासाठी...

पुणे टाइम्स टीम



'एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटी'च्या (एमआयटी डब्ल्यूपीयू) 'सेंट्रल रिसर्च फॅसिलिटी'मध्ये (सीआरएफ) अत्याधुनिक इंडक्टिव्हली कपल्ड प्लाझ्मा–मास स्पेक्ट्रोमेट्री (आयसीपी एमएस) हे उच्च दर्जाचे उपकरण संशोधनासाठी कार्यान्वित करण्यात आले आहे. या सुविधेमुळे विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाच्या विश्लेषण तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव घेण्याची संधी मिळणार आहे.

'आयसीपी एमएस' हे अत्यंत संवेदनशील विश्लेषण तंत्र असून, अतिसूक्ष्म घटकांचे अचूक मोजमाप करण्यासाठी वापरले जाते. या उपकरणामुळे विद्यार्थ्यांचे संशोधन प्रकल्प, प्रबंध, पीएच.डी. संशोधन; तसेच आंतरराष्ट्रीय दर्जाची संशोधन प्रकाशने उत्तम होतील. पर्यावरण अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांसाठी हे उपकरण विशेष उपयुक्त ठरणार आहे. पिण्याचे पाणी, भूजल, माती व औद्योगिक सांडपाणी यांमधील जड व विषारी धातूंचे विश्लेषण करून प्रदूषण मूल्यांकन आणि पर्यावरण संरक्षणाशी संबंधित संशोधन करता येणार आहे. सार्वजनिक आरोग्य व जैववैद्यकीय शाखांतील विद्यार्थ्यांना जैविक नमुन्यांतील धातूंचे प्रमाण तपासून आरोग्यावर होणारे परिणाम अभ्यासता येतील.

औषधांतील अशुद्धता, गुणवत्ता नियंत्रण आणि औषध सुरक्षिततेवरील संशोधनासाठी.

- साहित्य विज्ञान, नॅनो टेक्नॉलॉजी, ऊर्जा व इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात संशोधन करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी.
- विविध साहित्यांचे मूलद्रव्यीय विश्लेषण करण्यासाठी.
- आंतरविद्याशाखीय संशोधनाला प्रोत्साहन देण्यासाठी.